# उच्च माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन

**प्रा. बापूराव पांडुरंग खडके** यशवंतराव मोहिते महाविद्यालय, पुणे ३८

---

**प्रस्तावना :**

'थोर महात्मे होऊन गेले...' या केवळ भाषणात सादर केल्या जाणाऱ्या ओळी नसून समाजातील सर्व घटकांना प्रेरणा देणाऱ्या पंक्ती आहेत. पूरोगामी महाराष्ट्राचा उल्लेख 'फुले, शाहू, आंबेडकर' या नावांशिवाय केवळ अशक्य आहे. उत्तम शासक कसा असावा याचे उदाहरण म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव अग्रक्रमाने व आदराने घेतले जाते. वीरांची व संतांची भूमी असणारा महाराष्ट्र प्रदेश समाजसुधारकांच्या कार्यानेही ओळखला जातो. कर्त्या सुधारकांच्या श्रेय नामावलीत महाराष्ट्र राज्यातील अनेक समाजसुधारकांचा समावेश होतो. आपल्या कर्तृत्वाने या यादीत अढळ स्थान निर्माण करणारे थोर समाज सुधारक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय.

एकंदरच जगाची ढासळत जाणारी मूल्यव्यवस्था पाहता मानवतेसाठी महामानवांच्या विचारसरणीची निश्चितच आवश्यकता असल्याचे जाणवते. मानवाने निर्माण केलेली आजपर्यंतची कामगिरी क्षणात नष्ट होऊ शकते अशी आजची परिस्थिती आहे. या सर्वातून सावरण्यासाठी शाश्वत मूल्यांच्या विचारांची गरज आहे. हे विचार आजपर्यंत अनेक थोर विभूतींनी दिले आहेत. सर्व धर्मीयांनी श्रेष्ठ विचारच दिल्याचे आढळते. असे असताना टोकाची विचारसरणी का अवलंबिली जाते हाच खरा प्रश्न आहे.

कोणत्याही विचारसरणीची रुजवणूक ही शिक्षणातूनच होत असते. हे शिक्षण औपचारिक किंवा अनौपचारिकही असू शकते. ज्ञानाबरोबरच चांगले विचार देणारी पाठ्यपुस्तके म्हणूनच महत्त्वाची आहेत. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी हा युवा अवस्थेत असतो. या वयात त्याच्यावर झालेले संस्कार दीर्घकाळ टिकतात. म्हणून विद्यार्थ्यांसाठी मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातून विविध विषयांवरील संस्कारक्षम साहित्याचे पाठ अभ्यासक्रमात असतात. या शोधनिबंधातून इसवी सन १९७५ पासून ते २०२० पर्यंत निर्माण झालेल्या उच्च माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधनाचा अभ्यास करावयाचा आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याचा परिचय करून घेणे.
2. उच्च माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठी विषयाची पाठ्यपुस्तके जाणून घेणे.
3. उच्च माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना केलेले मार्गदर्शन आकलन करून घेणे.
4. उच्च माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र्य, समता व बंधुभाव याविषयी मौलिक विचारधनाचे महत्त्व समजून घेणे.
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माविषयी दिलेली शिकवण लक्षात घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी वर्णनात्मक व समाजशास्त्रीय पद्धतीचा वापर करून संशोधन कार्य केले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याचा परिचय :**

१४ एप्रिल १८९१ या दिनी महू या ठिकाणाहून सुरू झालेला भीमराव रामजी आंबेडकर या महामानवाचा प्रवास ६ डिसेंबर १९५६ रोजी थांबला. या कालखंडातील त्यांनी केलेल्या विविधांगी कार्याने ते चरित्र नायक ठरले आहेत. पिढ्यानपिढ्या केवळ शिक्षणापासूनच नव्हे तर सर्व सोयीसुविधांपासून दूर राहिलेल्या समाजात जन्मलेल्या बाबासाहेबांनी लहानपणापासून विषमतेचे चटके सोसले होते. ज्ञानप्राप्तीसाठी त्यांनी केलेला अविरत संघर्ष हाच युवा पिढीसाठी प्रेरणादायी आहे. प्राचीन सनातन धर्माची घटना बदलून सर्व समाजाला बरोबरीचे स्थान देणारी; स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांची जोपासना करणारी नवी राज्यघटना देशासाठी तयार करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व समाजाचे आदर्श ठरतात.

अनुकूल परिस्थितीतूनही संघर्ष करीत त्यांनी केलेली कामगिरी तरुणाईसाठी प्रेरणादायी आहे. प्राथमिक शाळेतील संघर्षापासून त्यांनी मिळवलेल्या विविध विद्यापीठातील पदव्यांची माहिती विद्यार्थ्यांना प्रेरणादायक आहे. बी.ए., एम.ए., पी.एचडी., एम. एस्सी., बार ॲट लॉ, डी. एस्सी. या शैक्षणिक पदव्यांबरोबरच एलएल. डी. व डी.लिट. या दोन सन्माननीय

पदव्याही त्यांच्या हयातीत प्राप्त झाल्या होत्या. भारतातील सर्वाधिक शिक्षण घेणाऱ्यांपैकी ते एक होते. गौतम बुद्धांनी सांगितलेला 'अत्त दीपो भव:' हा मंत्र आयुष्यभरासाठी जपला. 'आत्मोद्धारासाठी झगडत रहा' हा संदेश सर्वांना दिला. गुलामाला त्याच्या गुलामीची जाणीव करून देण्याचे महान काम त्यांनी केले आहे. भारताच्या राज्यघटनेबरोबरच शिक्षण, समाज सुधारणा, राजकारण, अर्थशास्त्र, ग्रंथकार अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी अनमोल कर्तृत्व गाजवले. केवळ दलितांविषयी असलेला सामाजिक भेदभाव दूर केला नसून हिंदू समाजातील महिला, कामगार यांच्या हक्काविषयी ते अखंड लढत राहिले. म्हणूनच मरणोत्तर भारतरत्न असणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व समाजाचे आदर्श ठरतात.

**उच्च माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाची पाठ्यपुस्तके :**

२७ जानेवारी १९६७ रोजी स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने १९६८ मध्ये 'बालभारती मराठी पुस्तक पहिले' हे पुस्तक तयार केले. कोठारी आयोगाच्या १०+२+३ या आकृतीबंधानुसार उच्च माध्यमिक विभागाकडे इयत्ता अकरावी व इयत्ता बारावी हे दोन वर्ग जोडण्यात आले. अशा उच्च माध्यमिक विभागासाठी १९७५ ते २०२० पर्यंत प्रथम भाषा मराठी विषयाची १५ पुस्तके आजपर्यंत प्रकाशित झालेली आहेत. उच्च माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषेच्या या पाठ्यपुस्तकात भाषेतील विविध साहित्य प्रकारांचा समावेश केल्याचे आढळते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक कृती बरोबरच प्रादेशिक समतोल, शिक्षणाचे गाभा घटक व जीवनमूल्ये या सर्वांचाच विचार पाठ्यपुस्तक तयार करताना केला जातो. भाषिक उद्दिष्टांबरोबरच रसग्रहणात्मक व सृजनात्मक ही वाङमयाची उद्दिष्टेही विद्यार्थ्यांना आत्मसात करावी लागतात. ज्ञान, आकलन, उपयोजन, अभिवृत्ती, अभिरुची, रसग्रहण या आधुनिक उद्दिष्टांचाही विचार अभ्यासक्रम तयार करताना केला जातो. उच्च माध्यमिक स्तरावर आजपर्यंत प्रकाशित झालेल्या १५ पुस्तकातून वैचारिक लेखनात विविध लेखकांच्या लेखनाचा समावेश दिसून येतो. या वैचारिक लेखनामध्ये पाच पुस्तकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध विषयावरील लेखन आढळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'प्रबुद्ध भारत' या ग्रंथातून 'लोकशाहीचे भवितव्य' हा पाठ घेतला आहे. डॉ. आंबेडकरांच्याच 'बहिष्कृत भारता'तील अग्रलेख म्हणजे 'महाड येथील धर्मसंगर' हा पाठ होय. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड एक' या पुस्तकातून १९३८ यावर्षी पुणे येथील अकराव्या अस्पृश्य विद्यार्थी संमेलनातील अध्यक्ष भाषण म्हणजे 'विद्यार्थ्यांनो जागृत व्हा!' हा पाठ आहे. याच पाठाचा काही भाग २०२० सालच्या इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमातही घेतलेला आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड सहावा' या ग्रंथातून 'आरसा' हा पाठ घेतलेला आहे. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या पाच पाठांचा समावेश पाठ्यपुस्तकात असल्याचे आढळून येते.

**उच्च माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन :**

इयत्ता अकरावी व इयत्ता बारावी या शैक्षणिक वर्षासाठी युवकांना वाङमयीन मूल्ये असणाऱ्या पाठाबरोबरच वैचारिक जडणघडण होणाऱ्या अभ्यासाची आवश्यकता असते. १९९५ व २०२० यावर्षी इयत्ता बारावीच्या मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकात 'विद्यार्थ्यांना, जागृत व्हा!' हा पाठ घेतलेला आहे. १९३८ मध्ये पुणे येथील अकराव्या अस्पृश्य विद्यार्थी संमेलन प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले अध्यक्षीय भाषण म्हणजे हा पाठ होय. आंबेडकरांनी दिलेला संदेश हा केवळ अस्पृश्य समाजाला लागू होत नाही. आत्मविश्वासाने विद्यार्जन करण्याबरोबरच शीलाचे महत्व या पाठात सांगितले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांना आपले गुरु मानतात अशा महात्मा फुले यांनी विद्येचे महत्त्व सांगताना अविद्येमुळे कशा गती, नीती, वित्त या गोष्टी दूर जातात हे स्पष्ट केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरही विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देतात. स्वतःला आजन्म विद्यार्थी समजणारे डॉ. आंबेडकर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वास्तव सांगताना म्हणतात, "आजच्या जीवनकलहाच्या दंगलीत पुढारलेल्या लोकांपेक्षा आम्ही नीरस ठरल्यास आमची धडगत होणार नाही. कारण आज सर्व सत्ताधारी म्हणून पुढारलेलेच वर्ग आहेत. नोकरी मागण्यास कोणत्याही ऑफिसात गेल्यास तेथे असलेले वरिष्ठ अधिकारी आपल्याच गोतावळयाचा भरणा करतात हे उघडे नागडे सत्य आहे."[१] आजच्या काळातील समाजातील सर्वच वर्गातील विद्यार्थ्यांना दिलेल्या हा मौलिक इशारा आहे. अडाणी आई-वडिलांचा तिरस्कार न करता कर्तव्याची जाणीव ठेवून अभ्यास करण्याचा सल्ला ते विद्यार्थ्यांना देतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतः २४ तासांपैकी २१ तास अभ्यास केल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास वाढवावा असे ते सांगतात. याप्रसंगी दंड थोपटण्याच्या आवाजाने गर्भगळीत होणारा पैलवान कुस्ती कशी खेळू शकेल असे उदाहरण विद्यार्थ्यांना देतात. प्रयत्न केल्यानंतर यशप्राप्ती होते हे सांगण्यासाठी स्वतःचे उदाहरण देताना ते म्हणतात,"मुंबईच्या डेव्हलपमेंट डिपार्टमेंटच्या चाळीत १० फूट लांब व १० फूट रुंद अशा खोलीत आईबाप, भावंडे यांच्यासह राहून एका

पैशाच्या घासलेट तेलावर अभ्यास केला आहे. इतकेच नव्हे तर अनेक अडचणींना व संकटांना त्याकाळी तोंड देऊन मी जर एवढे करू शकलो तर तुम्हास आजच्या साधनसामग्रीने सज्ज असलेल्या काळात अशक्य का होईल? कोणताही मनुष्य सतत दीर्घोद्योघानेच पराक्रमी व बुद्धिमान होऊ शकतो. कोणीही मनुष्य उपजात बुद्धिमान अगर पराक्रमी निपजू शकत नाही."[२] नुसत्या पदव्या म्हणजे ज्ञान नसून शिक्षकाच्या मदतीशिवाय ज्ञानार्जन करण्यास जमविलेली साधनसामग्री असल्याचा सल्लाही ते विद्यार्थ्यांना देतात. थोर गणितज्ज्ञ रामानुज याचे उदाहरण देऊन त्यांनी शिक्षण व व्यवहारज्ञान दोन्ही बाबींची आवश्यकता असल्याचे सांगितले आहे.

डॉ. आंबेडकरांनी विद्यार्थ्यांना शीलाचे महत्त्व पटवून दिले आहे. शीलाशिवाय विद्या व्यर्थ असून विद्या ही दुधारी तलवार असल्याचे ते विद्यार्थ्यांना सांगतात. तिचा उपयोग योग्य कारणासाठीच व्हायचा असेल तर चातुर्य व बुद्धीला सदाचारांची आवश्यकता आहे. शीलाशिवाय जर शिकले सवरलेले लोक निपजू लागले तर त्यांच्या शिक्षणातच समाजाचा व राष्ट्राचा नाश असल्याचे ते प्रतिपादन करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हे विचार विशिष्ट समाजासाठी आहेत असे कोणीच म्हणू शकत नाही.

**लोकशाही मूल्यांवरील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार :**

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या विविध पुस्तकातून, भाषणातून लोकशाही शासनव्यवस्थेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा आग्रह धरल्याचे दिसून येते. त्यांच्या 'प्रबुद्ध भारता'मध्ये प्रसिद्ध झालेला त्यांच्याच भाषणातील उतारा म्हणजे 'लोकशाहीचे भवितव्य' हा पाठ होय. यात लोकशाही समाजव्यवस्था यशस्वी होण्यासाठी काय करायला हवे याचे विवेचन केले आहे.

प्राचीन काळी भारतामध्ये लोकशाही तत्त्वाने चालणारी राजेशाही अस्तित्वात असल्याचे मत मांडून डॉ. आंबेडकरांनी बुद्धभिक्षुसंघाचे उदाहरण दिले आहे. या संघाचे कामकाज लोकसभेतील नियमासारखेच चालते. याचाच अर्थ लोकशाहीची अंमलबजावणी असणाऱ्या भारताने ही शासन व्यवस्था गमावली होती व कदाचीत दुसऱ्यांदा ती गमावणार काय ही भीतीही त्यांनी व्यक्त केली होती. ही भीती त्यांनी, "भारतात नवोदित झालेली लोकशाही आपले बाह्यांग व्यवस्थितपणे शाबूत राखून ठेवू शकेल. परंतु ती व्यवहारात हुकूमशाहीला आपली जागा बळकाविण्यास वाव देईल. असा चमत्कार घडून येणे सर्वथैव शक्य आहे. जर निसरटपणाची जागा असेल तर ती धोक्याची होय. पण तिच्यावरून घसरत जाऊन खोलदरीत पडण्याची शक्यता त्याहूनही जास्त धोक्याची होय."[३] अशा शब्दात व्यक्त केली आहे. ही भीती सत्यात उतरण्याच्या दिशेने आपली वाटचाल सुरू असल्याचे दिसून येत आहे.

लोकशाही केवळ नावालाच असून उपयोग नाही तर ती टिकवण्यासाठी सामाजिक व आर्थिक उद्देश केवळ सनदशीर मार्गानेच पूर्णत्वास न्यावा हा सल्ला डॉ. आंबेडकरांनी दिला होता. लोकशाहीचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांनी इंग्लंडमधील विख्यात तत्त्वज्ञ जॉन स्टुअर्ट याने दिलेला भयसूचक संदेश असा, "आपल्यातील एखादा माणूस कितीही मोठा असला तरी त्याच्या चरणी आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याची सुमने वाहू नयेत."[४] या भयसूचक संदेशाबरोबर भारताच्या राजकारणातील भक्ती किंवा व्यक्तिमाहात्म्य पूजेमुळे राजकीय पंथात हुकूमशाहीची सत्ता प्रस्थापित होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे.

लोकशाहीच्या अस्तित्वासाठी राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही निर्माण करावी लागेल. सामाजिक लोकशाहीत स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा समन्वय महत्त्वाचा. मात्र यातील समता आणि बंधुता या दोन्ही तत्त्वांचा अभाव दिसून येत आहे. भारतीय समाज रचना पाहता सामाजिक व आर्थिक बाबतीत असणारी विषमता स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षापर्यंत आपण कमी करू शकलो नाही. फक्त मताचा समान अधिकार ही एकमेव गोष्ट आजपर्यंतच्या अभ्यासात दिसून येते.

सामाजिक लोकशाहीतील बंधुता या तत्त्वाबाबतही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शंका उपस्थित केली होती. सर्व भारतीयांच्यात एकत्वाची भावना म्हणजे बंधुभाव. मात्र भारतात विविध प्रदेशांमध्ये विविध जाती-धर्माचे लोक राहतात. या सर्वांमध्ये परस्पर एकरूपतेचे वातावरण आजही दिसत नाही. राजकारणाच्या स्वार्थासाठी परस्परात विसंवाद कसा होईल हेच करण्याचा प्रयत्न काही लोक प्रामाणिकपणे करताना दिसतात. त्यामुळे बंधुभाव जर नसेल तर समता व स्वातंत्र्य यांच्या अस्तित्वाला अर्थ नाही. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, "बहुजन लोकांचा स्वाभिमान आता जागा झालेला आहे. त्यांच्यात स्वयंसिद्धपणाची जी ज्योत पेटलेली आहे, तिचे रूपांतर वर्ग कलहात अगर वर्ग युद्धात होऊ देता कामा नये. तसे होऊ दिले तर देशात बेकीचे पीक अमाप पिकेल. अशी स्थिती ज्या दिवशी उत्पन्न होईल तो देशाचा घातवार ठरेल."[५] हे जे विचार मांडले आहेत ते आज सत्यात उतरताना दिसत आहेत. समाजातील प्रत्येक जाती-जातीत, धर्मा-धर्मात बेदिली सुरू

असून लोकशाही सुद्धा धोक्यात येऊ शकेल. अशा सर्व परिस्थितीला सर्व भारतीय नागरिकच जबाबदार असतील. सर्वांवर संविधानाबरोबरच लोकशाही वाचवण्याचीही जबाबदारी येऊन पडली आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्माविषयी उदबोधन :**

इयत्ता बारावीच्या युवकभारती या १९८० साली प्रकाशित झालेल्या पाठ्यपुस्तकात 'महाड येथील धर्मसंगर' व इयत्ता अकरावीच्या २००६ साली प्रकाशित झालेल्या युवकभारतीच्या पाठ्यपुस्तकातील 'आरसा' या दोन पाठाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माविषयी समाजबांधवांना उद्बोधन केल्याचे दिसून येते.

महाड येथील सत्याग्रहाच्या निमित्ताने 'बहिष्कृत भारता'तील अग्रलेखामध्ये अस्पृश्यता हा केवळ हिंदू धर्मावरील कलंक नसून तो नरदेहावरील कलंक असल्याचे प्रतिपादन करून प्रसंगी तो रक्ताने धुऊन काढण्याचे आवाहन ते आपल्या बांधवांना करतात. महाड येथील धर्मसंगरात एकाच धर्माच्या लोकांच्यातील संघर्ष दिसून येतो. सामाजिकदृष्ट्या वरिष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव करणाऱ्यांनी संपर्काने धर्माचा विटाळ होईल म्हणून हा संघर्ष सुरू केला. पिढ्यानपिढ्या अन्याय सहन केलेला समाज जागृत झाल्यावर बौद्ध धर्मात प्रवेश करतो पण त्यांना बौद्ध धर्मात धर्मांतर करायला ज्यांनी भाग पाडले त्या समाजाविषयी आजही बहुजन समाज बोलायला तयार नाही. विशिष्ट वर्ग त्यांना दलित म्हणून कमी लेखत असेल तर इतर हिंदू बहुजनांनी त्यासंदर्भात कधी विरोध केला का? आंदोलने केली का? तो समाजही याच वर्गाप्रमाणे वागत होता का? अन्याय होत असताना शांत बसणे हा गैर कृत्याला दिलेला पाठिंबा नव्हे का? यासंबंधीही विचार होणे आवश्यक आहे.

डॉ. आंबेडकर या ठिकाणी पाश्चात्य राष्ट्राचे उदाहरण देऊन कोणी श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव न करता व्यवहार करताना आढळल्याचे सांगतात. सामाजिक, राजकीय व आर्थिक समानता तिथे दिसत आहे. ख्रिश्चन व मुस्लिम धर्मापेक्षाही हिंदू धर्म समतेला पोषक असल्याचे ते मान्य करतात. मात्र तत्त्वज्ञान व आचारातील हिंदू धर्माचा फोलपणा उघड करतात. धर्माचे आचार त्या धर्माच्या विचारांशी विरोधी असतील, तेव्हा तेव्हा धार्मिक आचारांमध्ये फेरबदल करून ते धार्मिक विचाराशी सुसंगत करून घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत ते मांडतात. तोंडाने 'मनुष्य ईश्वराचे रूप आहे' असे म्हणावयाचे व मनाने मात्र अमुक एका जातीत जन्मल्यामुळे अपवित्र मानावयाचे हा हिंदू धर्मातील दांभिकपणाचा आरोप नाहीसा करण्याचा कोणी प्रयत्न केला का हाच प्रश्न आहे. अस्पृश्यांनी महाडच्या तळ्यात पाण्याला स्पर्श केल्यावर शुद्धिसमारंभ घेऊन अस्पृश्य समाजाची बदनामी केली. असे शुद्धिसमारंभ आजच्या कालखंडातही घडतात हेच विशेष.

'आरसा' या पाठातून 'आपली सुधारणा आपणच केली पाहिजे' असा मूलगामी विचार मांडला आहे.१९५३ साली झालेल्या बुद्धजयंतीची बातमी वर्तमानपत्रांनी विपरीत स्वरूपात कशी छापली ते सांगून 'काही जरी केले तरी अस्पृश्यता जाऊ शकत नाही, राजकारणाने म्हणा किंवा धर्मकारणाने म्हणा अस्पृश्यता जाणार नाही' या वर्तमानपत्रातील टीकेला त्यांनी उत्तर दिले आहे.

परिवर्तनाला वेळ लागतो मात्र परिवर्तन होतेच यासाठी डॉ. आंबेडकरांनी नाशिकच्या सत्याग्रहाचे उदाहरण दिले आहे. त्याचबरोबर स्वतःच्या शिक्षणाचे उदाहरण देऊन त्यांना शाळेत प्रवेश न देण्यासंबंधी तीन दिवसाची सभा झाल्याचे सांगतात तर सिद्धार्थ कॉलेजमधील आजची स्थिती सांगून परिवर्तन घडल्याचे पटवून देतात. धर्मकार्य करताना कबीरांच्या,"कबीर कहे कुछ उद्यम कीजे, आप खाये और औरन को दीजे" या दोह्याचा उपयोग करून लोकांना उद्योगी बनवताना दिसतात. सर्वांना शस्त्रांचा परवाना नसणे व अज्ञान या दोन कारणाने जातीभेद राहिल्याचे मान्य करून आपली सुधारणा आपणच करायला हवी असे सांगतात. प्रत्येक माणसाच्या काया, वाचा व मने अशा त्रिशुद्धीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

**निष्कर्ष :**

1.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थ्यांना विद्यार्जनाचे व्यसन व्हायला हवे हे सांगून 'If you want success you must be narrow minded' असा मौलिक सल्लाही देतात.

2.आत्मविश्वास हीच खरी शक्ती असल्याचे सांगून स्पर्धेच्या या युगात विद्यार्थ्यांनी उच्च गुणवत्ता प्राप्त करावी असा सल्ला ते देतात.

3.अशिक्षित आई-वडिलांचा दुराभिमान न बाळगता दीर्घोद्योग व कष्ट करण्याचा सल्ला ते विद्यार्थ्यांना देतात.

4.विश्वविद्यालयाच्या पदव्या व बुद्धिमत्ता याचा काही परस्परसंबंध नसल्याचे ते अधोरेखित करतात.

5.चातुर्य व बुद्धीला सदाचारांची म्हणजेच शीलाची जोड हवी कारण शीलाशिवाय विद्या फुकाची आहे असे ते म्हणतात.

6.प्राचीन काळी लोकशाही तत्त्वाने चालणारी राजेशाही अस्तित्वात होती हे ते सप्रमाण सांगतात.

7.लोकशाही टिकवण्यासाठी सामाजिक व आर्थिक उद्देश सनदशीर मार्गाने पूर्ण करण्याचा सल्ला देतात.

8.सामाजिक लोकशाहीत स्वातंत्र्य, समता व बंधुता यांची आवश्यकता असल्याचे सांगून व्यक्तिमाहात्म्यपूजेमुळे हुकूमशाही येऊ शकते असा धोकाही ते व्यक्त करतात.

9.कोणत्याही धर्मात अस्पृश्यता असता कामा नये अशी अपेक्षा व्यक्त करून आपली सुधारणा आपणच केली पाहिजे असे ते मत मांडतात.

**सारांश :**

उच्च माध्यमिक स्तरावरील प्रथम भाषा मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन मौलिक आहेत. संस्कारक्षम वयाच्या विद्यार्थ्यांवर विचारांची रुजवणूक होण्यासाठी अजूनही काही पाठ असते तर ते योग्य झाले असते. डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केलेलेच विचार १९८६ साली प्रकाशित झालेल्या इयत्ता अकरावीच्या युवकभारती या पाठात दिसून येतात. म.भि. चिटणीस यांच्या 'सामाजिक लोकशाहीचे प्रणेते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पाठात समतेसाठी मांडलेली सामाजिक लोकशाहीची संकल्पना व्यक्त झाली आहे. या पाठाव्यतिरिक्त प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व्यक्त करणारे इतरही पाठ पाठ्यपुस्तकात असू शकतात. समस्येच्या मुळाशी जाऊन विचार करण्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा जाणवते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यासाठी प्रत्येक व्यक्तीच्या मतपरिवर्तनाची आवश्यकता असल्याचे परखड मत ते व्यक्त करतात.

**संदर्भ :**

१. युवकभारती इयत्ता बारावी १९९५ - महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे पान नंबर १४,१५

२. तत्रैव : पान नंबर १५

३. कुमारभारती इयत्ता बारावी १९७६, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, पान नंबर ३३

४. तत्रैव: पान नंबर ३४

५. तत्रैव: पान नंबर ३६